**डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**निम्नस्तर कृषि शिक्षण विभाग,**

# <u>जाहिरात</u>

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत निम्नस्तर कृषि शिक्षण विभागात "<u>निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात ११ महिने तत्वावर</u>" खाली दिलेल्या तपशिलाप्रमाणे पद भरण्यासाठी पात्र उमेदवारांची प्रत्यक्ष थेट मुलाखत घेण्यात येईल. सदर मुलाखतीचा दिनांक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर पदांसाठी सादर करावयाचा अर्जाचा तपशिल व निवड प्रक्रियेचा तपशिल नियम/अटी व शर्तीमध्ये नमुद करण्यात आले आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | पदांची संख्या | वेतन एकापदाकरीता एकत्रित प्रतिमहिना (रू.) | नेमणूकीचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | कार्यालय सहाय्यक | १ | १२,०००/— | ११ महिने |

<u>पदासाठी पात्रता :—</u>

| | |
|---|---|
| कार्यालय सहाय्यक | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी झाल्याचे प्रमाणपत्र<br>ब) शासकीय मान्यताप्राप्त टंकलेखन इंग्रजी ४० श.प्र.मि. आणि मराठी ३० श.प्र.मि. परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>क) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>ड) विद्यापीठ कार्यालयीन कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल. |

<u>नियम / अटी व शर्ती :—</u>

१. वयोमर्यादा— खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता अर्जदाराचे वय ३८ वर्षे व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांकरीता ४३ वर्षे राहील.

२. इच्छुक उमेदवारांनी विहीत अर्जाच्या नमुन्यामध्ये पुर्ण तपशिल भरून अर्ज आवश्यक कागदपत्रांसहित सादर करावा. सदर अर्ज दिनांक <u>२६/०६/२०२३</u> पर्यंत मा. सहयोगी

अधिष्ठाता, निम्नस्तर कृषि शिक्षण विभाग, डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचे नावे **टपालाने, हातबटवडा अथवा कुरीअरमार्गे** पाठविण्यात यावा.

३. अर्जासोबत **शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा पुरावा व इतर आवश्यक कागदपत्रांची सत्यप्रत अथवा स्वयंसाक्षांकित छायांकितप्रती** सोबत जोडणे आवश्यक आहे. अर्जावर स्वत:चा अलिकडचा फोटो चिकटवावा.

४. लखोटयावर **"पद – कार्यालयीन सहाय्यक पदासाठी अर्ज"** असे लिहिलेले असावे.

५. उमेदवारांच्या प्राप्त अर्जांची छाननी करण्यात येईल व पात्र अर्जधारकांची यादी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर **https://dbskkv.org/** प्रसिध्द करण्यात येईल.

६. पात्र उमेदवारांची निवड समितीव्द्ारे नमुद तारखेला मुलाखत घेण्यात येईल.

७. मुलाखतीच्या दिवशी अर्जासोबत नमुद सर्व मुळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

८. मुलाखतीसाठी उपस्थित असलेल्या उमेदवारांना कोणताही प्रवासभत्ता देय केला जाणार नाही.

९. निवड झालेल्या उमेदवाराला रू. १००/–किमतीच्या स्टॅम्प पेपरवर नियुक्ती कालावधी दरम्यान तो नोकरी सोडणार नाही आणि नेमुन दिलेले काम पुर्ण करेल आणि तो नियमित नियुक्तीसाठी दावा करणार नाही असे हमीपत्र देणे आवश्यक राहील.

१०. उमेदवाराला प्रकल्प/योजनेतील नेमणूक पुढे चालू ठेवण्यासाठी तसेच डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोलीच्या नियीमत आस्थापनेवर नियुक्तीसाठी दावा करता येणार नाही.

११.उमेदवाराला नोकरी सोडून जाण्याची इच्छा असल्यास एक महिन्याची आगाऊ सुचना द्यावी लागेल अन्यथा एक महिन्याचे वेतन भरणा करावे लागेल.

१२. निवडलेल्या उमेदवारांना विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात जेथे योजना कार्यरत आहे तेथे नियुक्ती देण्यात येईल.

१३. तात्पुरत्या नेमणुकी नंतर निवड करण्यात आलेल्या उमेदवाराने राजीनामा दिल्यास प्रतिक्षासूचीतील उमेदवाराची उर्वरीत कालावधीसाठी नियुक्ती करण्यात येईल.

१४. तात्पुरत्या नेमणुकीच्या कालावधीत सर्व शासकीय सुट्टया आणि दोन महिन्यांसाठी एक यानुसार किरकोळ रजा देय राहतील. या व्यतिरीक्त रजा हया बिनपगारी करण्यात याव्यात.

१५. कार्यालयाच्या कामकाजाची वेळ सकाळी ०९.०० ते सायंकाळी १७.३० अशी राहील तथापी, एखाद्या दिवसाचे काम वाढल्यास काम पुर्ण होईपर्यंत थांबावे लागेल याची नोंद घ्यावी.

१६. तसेच सुट्टीच्या दिवशी सुध्दा कामाच्या निकडीनुसार उपस्थित रहावे लागेल.

१७. जादा केलेल्या कामाचा कोणताही मेहनताना देण्यात येणार नाही.

१८. काम समाधानकारक न वाटल्यास त्याच्या सेवा कोणत्याही दिवशी समाप्त करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकार राहतील.

१९. सदर तात्पुरती नियुक्ती अकरा महिने कालावधीकरीता राहील. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थीतीत कोणत्याही वेळी अशा तात्पुरत्या नियुक्त्या सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

२०. सर्वोच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या याचिका क्र. एसएलपी—५४५३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या नियुक्तीवरिल उमेदवारास विद्यापीठ सेवेत कायमस्वरूपी नोकरी मिळण्याबाबत हक्क राहणार नाही.

२१. कोणत्याही टपाल विलंबासाठी संबंधित कार्यालय जबाबदार राहणार नाही.

२२. लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नमुना—अ मध्ये अर्जासोबत सादर करावे. लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नमुना—अ चे प्रपत्र जाहिराती सोबत जोडण्यात आले आहे.

२३. वयाचा लाभ/फायदा उमेदवारावास घ्यावयाचा असल्यास जातीचा दाखला सादर करणे आवश्यक राहिल.

२४. नावामध्ये बदल असल्सास गॅझेट (राजपत्र) जोडण्यात यावे.

**सही/-**
**सहयोगी अधिष्ठाता**
**निम्नस्तर कृषि शिक्षण विभाग,**
**डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली**

डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
निम्नस्तर कृषि शिक्षण विभाग, डॉ. बा.सा.कोंकृवि. दापोली

## जाहिरात अर्ज नमुना

पासपोर्ट आकाराचा फोटो येथे चिकटवण्यात यावा

१. अर्जदाराचे नाव :
२. पदाचे नाव :
३. जन्मतारीख :
४. पत्र व्यवहारासाठी संपुर्ण पत्ता :
५. संपर्क कमांक :
६. ई—मेल :
७. दिनांक.........रोजी वय : ........ वर्ष .......... महिने ............. दिवस
८. धर्म/ जात :
९. शैक्षणिक अर्हता :

| अ.क्र. | परिक्षा/ पदवीचे नाव/ कोर्सचे नाव | बोर्ड / महाविद्यालयाचे / शाळेचे नाव | उत्तीर्ण वर्ष | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |

१०. अनुभव :

| प्दाचे नाव | कालावधी | | कामाचेस्वरूप | कामाचेठिकाण |
|---|---|---|---|---|
| | पासुन | पर्यंत | | |
| | | | | |

११. इतर:

मी असे लिहून देतो /देते की, वर दिलेली सर्व माहिती बरोबर असून ती सत्य आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास पदासाठी मी पात्र नसेन याची मला जाणीव आहे.

दिनांक :—

ठिकाण :—

उमेदवाराची स्वाक्षरी

टिप : अर्जासोबत जोडण्यात येणाऱ्या सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती सत्यप्रत अथवा स्वयंसाक्षांकित केलेल्या असाव्यात.

जाहिरातीमधील नमुद आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत आढळुन आली नाही तर सदर अर्ज अपात्र ठरविण्यात येईल

याची कृपया नोंद घेण्यात यावी.

**महाराष्ट्र नागरीसेवा (लहान कुटुंबाचेप्रतिज्ञापत्र) नियम, २००५ मधील प्रतिज्ञा पत्राचा**
**नमुना— अ**
**प्रतिज्ञा पत्र**

मी, श्री / श्रीमती / कुमारी ............................................................
.......................................

श्री. ...................................................... यांचा / यांची मुलगा/ मुलगी /पत्नी, वय .......... वर्षे, राहणार, ............................. याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

१. मी “पद — कार्यालयीन सहाय्यक” या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२. आज रोजी मला ......... (संख्या) इतकी मुले हयात आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ....... आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमुद करावा.)

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्हता ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण—

उमेदवाराची सही